N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड  **P.S.(ठाणे):** शिवाजीनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0549  **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/11/2025 17:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार  **Date From (दिनांक पासून):** 19/11/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/11/2025

**Time From (वेळेपासून):** 13:19 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/11/2025  **Time (वेळ):** 17:17 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 020

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/11/2025 17:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अंबीका चौकचे बाजुस ,खाजगी गाळा बीड , बीड, बीड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सोपान सोनाजी चिट्टमपल्ले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप-अधीक्षक ला प्र वि ,बीड,बीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप-अधीक्षक ला प्र वि ,बीड,बीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9270221064

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनायक मिठु राठोड | | | 1. रायगड कालनी,उत्तम नगर,बीड, बीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या दोन नोटा | 1,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
1,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
ला.प्र.वि.कार्यालय,बीड
दिनांक -22/11/2025

मी सोपान सोनाजी चिट्टमपल्ले, वय 43 वर्षे व्यवसाय-नौकरी,पोलीस उप-अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड मोनं 9270221064, 9518973185

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होऊन पो.ठा.शिवाजीनगर येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे दि-31-05-2025 पासून पोलीस उप अधीक्षक म्हणून कार्यरत आहे.
मी, दि.18/11/2025 रोजी ला.प्र.वि.बीड येथे हजर असतांना तक्रारदार श्री.मिनानाथ कारभारी चिकणे रा. गंगावाडी ता. गेवराई जि. बीड हे ला.प्र.वि.बीड येथे माझे समक्ष हजर आले व त्यांची एका लोकसेवका विरुध्द तक्रार आहे असे कळवुन मी, दि.19/11/2025 रोजी लोकसेवक यांची भेट घेणार असल्याचे कळविले. त्यानंतर मी, तक्रारदार यांना लेखी तक्रार देण्यास कळविले असता तक्रारदार यांनी दि.19//11/2025 रोजी हजर येवुन सविस्तर लेखी तक्रारदार देतो असे सांगीतले.
त्यावर आम्ही लागलीच मा.शिक्षणाधिकारी, जि.प.बीड यांना ला.प्र.वि.बीड जा.क्र. 31 दि.18/11/2025 गोपनिय कामकाज कामी पत्र देवुन दोन पंच कर्मचारी उपलब्ध करुन घेतले व सदर पंच हजर आलेनंतर त्यांना सुचना देवुन दि.19/11/2025 रोजी तक्रारदार येणार असुन त्यांची सविस्तर तक्रार घेवुन कारवाई करणे आहे असे सांगुन दि. 19/11/2025 रोजी 11.00 वा लाप्रवि, बीड येथे हजर राहणे बाबत सुचना दिल्या.
दि.19/11/2025 रोजी आम्ही स्वत:,सफौ.सांगळे, पोलीस अमलदार श्री.बीडकर, श्री.सुरवसे व श्री.खरसाडे चालक श्री.अंबादास पुरी व दोन्ही पंच असे सापळा कारवाईसाठी लागणारे आवश्यक त्या सर्व साहित्यासह लाप्रवि, बीड येथे हजर असताना तक्रारदार श्री.मिनानाथ कारभारी चिकणे हे ला.प्र.वि,बीड येथे हजर आले. आम्ही तक्रारदार यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री.मिनानाथ कारभारी चिकणे, वय-40 वर्ष, व्यवसाय-शेती रा.गंगावाडी ता.गेवराई जि.बीड असे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.मिनानाथ चिकणे यांना सापळा पथकातील सदस्य व पंचांचा परिचय करुन दिला. त्यानंतर नियोजीत सापळा कारवाईचे अनुषंगाने श्री. वडचकर यांची पंच क्रमांक 1 म्हणुन तर श्री.देशमुख यांची पंच क्रमांक 2 म्हणून नेमणूक करण्यात आली. आम्ही तक्रारदार श्री.मिनानाथ चिकणे यांना तक्रारी बाबत विचारणा केली असता त्यांनी पंचासमक्ष तक्रार लिहुन दिली की, " मौजे गंगावाडी ता.गेवराई जि.बीड येथील गट क्र.362 मध्ये माझे भाऊ राजाभाऊ कारभारी चिकणे यांचे नावे गंगावाडी शिवारात व गंगावाडी येथील पीटीआर मालमत्ता क्र.473 मध्ये माझी पत्नी सौ.विद्या मिनानाथ चिकणे यांचे नावे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना 2024-2025 अंतर्गत मागेल त्याला गाय गोठा कामाचे प्रस्ताव तयार केला असुन सदर प्रस्तावास प्रशाकिय मान्यता क्रमांक 194 दि.11/11/2025 व पत्नी विद्या मिनानाथ चिकणे यांचे नावे प्रशासकिय मान्यता क्रमांक 1591 दि.11/11/2025 रोजी प्राप्त झाल्याने सदर गाय गोठा कामाची फाईलवर शाखा अभियंता,म.ग्रा.रो.ह.यो.पंचायत समिती गेवराई यांची सही घेवुन तात्रीक मान्यता घेणे करीता मी, पंचायत समीती कार्यालय गेवराई येथे गेलो असता तेथील कर्मचारी यांनी माझे कडील दोन्ही गाय गोठयाचे फाईलवर तांत्रीक मान्यतेचा शिक्का मारुन तात्रीक मान्यता क्र.1659 व 1648 दि.11/11/2025 असा टाकुन मला शाखा अभियंता, म.ग्रा.रो. ह.यो.पंचायत समिती गेवराई यांची सही घेणे बाबत सांगीतले. त्यावेळी माझी शाखा अभियंता यांची भेट झाली नाही. त्यानंतर मी दिनांक 14/11/2025 रोजी श्री.राठोड शाखा अभियंता यांना त्यांचे मोबाईल क्र.8788035512 वर माझे मोबाईल क्र.8975514351 वरुन संपर्क केला असता त्यांनी मला तांत्रीक मान्यतेवर सही करण्यासाठी 1000/- रुपये लागतील असे सांगुन मला अंबीका चौक बीडला येवुन त्यांची भेट घेण्यास सांगीतले." वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने त्याची तक्रार पंचासमक्ष घेवुन तक्रार व कागदपत्रावर आम्ही,

पंच,तक्रारदार यांनी सहया केल्या.

तक्रारदार श्री.मिनानाथ चिकणे यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि.19/11/2025 रोजी आम्ही लोकसेवक श्री.राठोड हे तक्रारदार यांचेकडे गाय गोठयाच्या दोन्ही फाईल वर तांत्रीक मान्यतेच्या शिक्कयावर सही करण्यासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत तक्रारदार व पंच क्र. 1 श्री.वडचकर यांना लोकसेवक श्री.राठोड यांचेकडे त्यांचे अबीका चौक, बीड जवळील गाळयामध्ये असलेल्या खाजगी ऑफीस येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देवुन व्हाईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन श्री.खरसाडे यांनी व्हाईस रकॉर्डर तक्रारदार यांचे देवुन सुरक्षीत ठिकाणी ठेवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र.-1 श्री.वडचकर यांना लोकसेवक श्री.राठोड यांची भेट घेण्यासाठी अंबीका चौक, बीड जवळील गाळयामध्ये असलेल्या खाजगी ऑफीस येथे 13.19 वा. तक्रारदार यांचे कडील खाजगी मोटारसायकलने रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 श्री.वडचकर हे त्यांचेकडील मोटारसायकलने 13.35 वा. लाप्रवि,बीड येथे परत आले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोशि/खरसाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.1श्री. वडचकर यांना स्वतंत्र विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार व पंच क्र.1 श्री.वडचकर असे लोकसेवक श्री.राठोड यांचे अंबीका चौक, बीड जवळील गाळयामध्ये असलेल्या खाजगी ऑफीस येथे गेले असता त्या ठिकाणी तक्रारदार व लोकसेवक श्री.राठोड यांची भेट झाली. भेटी दरम्यान कामासंदर्भाने चर्चा झाली. चर्चेदरम्यान तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.राठोड यांना "दोन्ही फाईलीत" असे म्हणाले असता श्री.राठोड यांनी फाईल स्वत:जवळ घेवुन "सह्याच राहील्यात ना" असे म्हणुन दोन्ही फाईलीवर सह्या केल्या व तक्रारदार यांच्याकडे "हाईत का" असे म्हणुन पैशाबाबत विचारले असता तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. राठोड यांना "किती . ह्याचे किती द्यायचे" असे विचारले असता लोकसेवक श्री.राठोड यांनी "हजार रुपये, हजार रुपये घेतो मी दोन्हीचे" असे म्हणुन 1000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी प्रत्येकी " पाचशे पाचशे घेता का" असे म्हणाले असता लोकसेवक श्री. राठोड यांनी "हं" असे म्हणुन तक्रारदार यांच्याकडे 1000/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम 1000/- लागलीच स्विकारण्याचे मान्य केले.

लाचमागणी पडताळणी वरुन लोकसेवक श्री.राठोड शाखा अभियंता म.ग्रा.रो.ह.यो.प.सं.गेवराई. यांचेविरुध्द अंबीका चौक जवळील त्यांचे खाजगी कार्यालय असलेल्या गाळा येथे लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे तक्रारदार यांना सांगितले त्यावरुन ला.प्र.वि.बीड या ठिकाणी शासकीय पंचासमक्ष आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या ज्यामध्ये 500/रु दारच्या 02 नोटा असे एकुण 1000/-रुपये लाच रककमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाचरक्कम ही तक्रारदार यांचे पॅटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. तक्रारदार यांना लाच स्वीकृतीनंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला व वेळेअभावी लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करुन लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा सापळा कारवाई झाल्यानंतर एकत्रीत करण्यात येणार असल्याचे आम्ही पंच व तक्रारदारास सांगीतले.

सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचेकडे देऊन सुरक्षीत ठेवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र.1 श्री. वडजकर यांना लोकसेवक राठोड यांची भेट घेण्यासाठी अंबीका चौक जवळील त्यांचे खाजगी कार्यालय असलेल्या गाळा येथे 14.12 वा रवाना केले. त्याचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 श्री. देशमुख व सापळा पथक शासकीय वाहनाने रवाना झालो. तक्रारदार पंच क्र.1 असे अंबीका चौक जवळील लोकसेवक श्री राठोड यांचे खाजगी कार्यालय असलेल्या गाळा येथे गेले त्यानंतर काही वेळाने तक्रारदार हे इशारा न करता वापस निघाले त्यांचे पाठोपाठ मी व सापळा पथक ला.प्र.वि. बीड येथे 14.33 वा हजर आलोत. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोशि/खरसाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.1 यांना स्वतंत्र विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार यांची व लोकसेवक राठोड यांची भेट झाली नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी तेथील एका व्यक्तीस राठोड साहेब गेले का असे विचारले असता त्या व्यक्तीने राठोड साहेब गेल्याचे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.राठोड शाखा अभियंता यांना त्यांचे मोबाईल क्र.8788035512 वर तक्रारदार यांचे मोबाईल क्र.8975514351 वरुन संपर्क करुन तुमच्या ऑफीसला आलो आहे असे सांगीतले असता श्री. राठोड यांनी "नाही आता मी गेलो एवढा वेळ असतो का... मी गेलो सिरसदेवीला " असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी "हाई का तुम्हाला म्हणल सागर कडुन घेवुन आणुन देतो " त्यावेळी श्री. राठोड यांनी काही नाही विषय सोडुन द्या असे म्हणुन फोन ठेवला असे सांगीतले

व लोकसेवक यांची भेट न झाल्यामुळे तक्रारदार हे लाप्रवि, बीड येथे परत आले. त्यानंतर सापळा कारवाई स्थगीत करुन तक्रारदार यांचेकडील अॅथ्रोसिन पावडर लावलेली लाचरक्कम 1000/- रुपये ताब्यात घेवुन लिफाफामध्ये बंद करुन ताब्यात घेतली व तक्रारदार यांच्या विनंतीवरुन लोकसेवक श्री.राठोड यांचे विरुध्द दिनांक 20/11/2025 रोजी पुन्हा एकदा सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन दिनांक 19/11/2025 रोजीचा लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाई स्थगीती पंचनामा करुन तक्रारदार पंच व सापळा पथकास गोपनियते बाबत सुचना देवुन दि.20/11/2025 रोजी लाप्रवि,बीड येथे हजर येण्यास सांगीतले.
दिनांक 20/11/2025 रोजी तक्रारदार श्री.मीनानाथ चिकणे, पंच असे ला.प्र.वि. बीड येथे हजर आल्याने आम्ही तक्रारदार,पंच व सापळा पथक असे सुरक्षीत ठीकाण सिध्दी विनायक मंदिर, ITI मागे, बीड येथे जावुन सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचनांची उजळणी करुन देवुन आमचे सुचनेवरुन श्री.प्रदिप सुरवसे यांनी शासकीय वाहनाचे बॅग मधुन लाचरकमेचा लिफाफा काढुन त्यामधील लाचरक्कम 1000/- रुपये तक्रारदार मिनानाथ चिकणे यांचे समोरील पॅन्टचे उजवे बाजुचे खिशात ठेवुन त्यांना सुचनांची उजळणी करुन देवुन पोशि/खरसाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करण्यास सांगुन मी तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 8975514351 वरुन लोकसेवक श्री. राठोड यांचा मोबाईल क्रमांक 8788035512 वर फोन लावुन स्पिकर ऑन करण्यास सांगुन व्हाईस रेकॉड्रर चालु केला असता लोकसेवक श्री. राठोड यांचा फोन लागत नाही असे लक्षात आले म्हणुन तक्रारदार श्री. मीनानाथ चिकणे व पंच क्रमांक 1. वडचकर यांना लोकसेवक श्री. राठोड यांचे अंबिका चौकातील खाजगी कार्यलयात 14.44 वा. पाठवुन त्यांचे पाठीमागे आम्ही व सापळा पथक शासकीय वाहनाने गेलो असता काही वेळाने तक्रारदार हे इशारा न करता वापस निघाले त्यांचे पाठोपाठ मी व सापळा पथक असे सिध्दी विनायक मंदिर, ITI मागे, बीड सुरक्षीत ठीकाणी 14.52 वा हजर आलोत. आमचे सुचनेवरुन श्री. खरसाडे यांनी तक्रादार कडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्या वेळी आम्ही तक्रारदार मीनानाथ चिकणे व पंच क्र.1.वडचकर यांना काय झाले असे विचारले असता त्यांनी लोकसेवक श्री. राठोड यांचे अंबीका चौकातील खाजगी कार्यालय बंद असल्याने आम्ही परत आलोत असे सांगीतले. व लोकसेवक श्री. राठोड यांचे खाजगी कार्यालय बंद असल्याने त्यांची भेट न झाल्यामुळे लाच रक्कम दिली नाही. त्यानंतर सापळा कारवाई स्थगीत करुन तक्रारदार यांचेकडील अॅथ्रोसिन पावडर लावलेली लाचरक्कम 1000/- रुपये ताब्यात घेवुन लिफाफामध्ये बंद करुन ताब्यात घेतली. तक्रारदार यांच्या विनंतीवरुन लोकसेवक श्री. राठोड यांचे विरुध्द दिनांक 21/11/2025 रोजी पुन्हा एकदा सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन दिनांक 20/11/2025 रोजीचा सापळा कारवाई स्थगीती पंचनामा ला. प्र. वि. बीड येथे येवुन केला. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास आम्ही गोपनियते बाबत सुचना दिल्या व दिनांक 21/11/2025 रोजी ला. प्र. वि. कार्यालय बीड येथे सर्वांनी हजर राहणे बाबत सुचना दिल्या.
दि. 21/11/2025 रोजी तक्रारदार हे लाप्रवि, बीड येथे हजर आले असता आम्ही त्यांना पंचा समक्ष सापळा कारवाई संदर्भाने विचारणा केली असता तक्रारदार यांनी कळविले की, " दि.21/11/2025 रोजी सुध्दा लोकसेवक श्री.राठोड यांचे खाजगी कार्यालय, बंद आहे व त्यांना माझ्या हालचालीवर संशय आलेला असुन त्यांनी माझा मोबाईल क्रमांक ब्लॅक लीस्ट मध्ये टाकलेला आहे. तरी लोकसेवक श्री.राठोड हे आता माझ्या कडुन पैसे स्विकारणार नाहीत असे मला वाटते त्यामुळे आपण त्याचेविरुध्द झालेल्या कारवाईवरुन पुढील कारवाई करावी." वगैरे मजकुराची हकिगत सांगत असल्याने तसा त्याचा दि.21/11/2025 रोजी सविस्तर जबाब नोदवला आहे. लोकसेवक श्री.राठोड हे तक्रारदार यांचेकडुन पैसे घेणार नाहीत अशी तक्रारदार यांची खात्री झाली आहे. " म्हणुन आम्ही सरकार तर्फे फियांदी होवुन फिर्याद देण्याचा निर्णय घेतला.
तरी लोकसेवक श्री.विनायक मितु राठोड, वय-42 वर्ष, व्यवसाय-नोकरी, स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक पंचायत समिति, गेवराई जि.बीड रा.रायगड कॉलनी, उत्तम नगर, बीड मुळ रा.वसंतनगर तांडा पाचेगाव ता.गेवराई जि.बीड (वर्ग-3) यांनी दिनांक 19/11/2025 रोजी 13.19 वा. ते 13.35 वा. चे दरम्यान अबीका चौक, बीड जवळील गाळयामध्ये असलेल्या खाजगी ऑफीस येथे तक्रारदार श्री.मिनानाथ चिकणे यांचे मौजे गंगावाडी ता.गेवराई जि.बीड येथील गट क्र.362 मध्ये तक्रारदार यांचे भाऊ राजाभाऊ कारभारी चिकणे यांचे नावे गंगावाडी शिवारात व तक्रारदार यांची पत्नी सौ.विद्या मिनानाथ चिकणे गंगावाडी येथील पीटीआर मालमत्ता क्र.473 मध्ये त्यांचे नावे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना 2024-2025 अंतर्गत मागेल त्याला गाय गोठा कामाचे प्रस्ताव तयार केला असुन सदर प्रस्तावास प्रशासकिय मान्यता क्रमांक 1594 व पत्नी विद्या मिनानाथ चिकणे यांचे नावे प्रशासकिय मान्यता क्रमांक 1591 दि.11/11/2025 रोजी प्राप्त झाल्याने सदर गाय गोठा कामाची फाईलवर शाखा अभियंता,म.ग्रा.रो.ह.यो.पंचायत समिती गेवराई यांनी तक्रारदारचे पत्नी व भावाचे नावे असलेल्या गाय गोठयाच्या दोन्ही फाईलमधील तांत्रीक मान्यता देण्यासाठी तात्रीक मान्यतेवरचे शिक्यावर सही करण्यासाठी प्रत्येकी

500/- रुपये प्रमाणे दोन्ही फाईलचे 1000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरचे दोन्ही फाईलवर तात्रीक मान्यतेवरचे शिक्यावर सही करुन लागलीच लाचरक्कम स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन माझी लोकसेवक श्री. विनायक मिठु राठोड, वय-42 वर्ष, व्यवसाय-नोकरी, स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक पंचायत समिती, गेवराई जि. बीड रा.रायगड कॉलनी, उत्तम नगर, बीड मुळ रा.वसंतनगर तांडा पाचेगाव ता.गेवराई जि.बीड (वर्ग-3) यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे फिर्याद आहे.
हि फिर्याद दिली ते माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

फिर्यादी

(सोपान चिट्टमपल्ले )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAVINKUMAR YUVRAJ BANGAR(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** PRAVINKUMAR YUVF
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

पो.ठा.अमलदार
पो.स्टे.शिवाजीनगर बीड